# प्रकरण पाचवे

## उपसंहार

प्र क र ण – पा च वे

## उपसंहार

महाराष्ट्राच्या शैक्षणिक व सामाजिक जडणघडणीला एक ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. महात्मा जोतिबा फुले, राजर्षि छत्रपति शाहू महाराज, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील अशा अनेक थोर विभूतींनी समर्पित भावनेने बहुजन समाजाच्या उत्थानासाठी स्वतःचे जीवन वाहिले आहे. याच गौरवशाली परंपरेतील आणखी एक कर्मयोगी म्हणजे डॉ. आप्पासाहेब पवार हे होत.

1906 सालच्या मे महिन्यातल्या 5 तारखेला बेळगाव जवळच्या मुचंडीसारख्या खेडयात डॉ. आप्पासाहेब पवार यांचा जन्म झाला होता. त्यांना गरीब, शेतकरी, अध्यात्मिक कुटुंबाचा वारसा लाभलेला होता, अशा प्रतिकुल परिस्थितीत जन्मलेल्या डॉ. आप्पासाहेब पवार यांना मुंबई विद्यापीठाच्या एम्.ए., एल्एल्.बी. या परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत आणि लंडनची पीएच्.डी. आणि बार--ॲट--लॉ या पदव्या संपादन करेपर्यंत काटयांच्या वाटेवरुन पळावे लागले असेल, की गुलाब पुष्पांच्या पायघडया समजून दगडधोंडयातून वाट काढावी लागली असेल याची फक्त कल्पनाच केलेली बरी. शहराचे वारेसुद्धा जवळून जाणे दुर्मिळ असलेल्या एखाद्या खेडेगावात जन्मलेला मुलगा उच्च शिक्षणासाठी लंडनला जाऊ शकतो आणि उच्च पदव्या संपादन करुन आपल्या समाजाची सेवा करण्यासाठी मायदेशी परत येऊ शकतो, अशी उदाहरणे फार कमी आहेत. यांत डॉ. आप्पासाहेब पवार यांचे स्थान वरच्या क्रमांकाचे आहे. या घटनेतून त्यांचे मातृभूमीवरील आणि देशवासीयांवरील प्रेम व्यक्त होते. डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या नावातच आ.ग. ही अक्षरे आहेत. त्यामुळे त्यांनी प्रतिकुल परिस्थितीतही आगीच्या लोळाप्रमाणे धडक मारुन परिस्थितीवर मात केली आहे.

डॉ. आप्पासाहेब पवार यांचे बहुतेक सर्व शिक्षण अनेकांच्या आर्थिक मदतीच्या आधाराने पूर्ण झाले आहे. ज्या समाजाच्या हातभाराने ते उच्च शिक्षित झाले, त्या समाजाची उतराई करण्याचा चंग बांधूनच जणू ते लंडनहून मायदेशी परत आले.

त्यांनी कोल्हापूरातील राजाराम महाविद्यालयात प्राध्यापकीपासून शैक्षणिक जीवनाला सुरुवात केली. इतिहास व अर्थशास्त्र विषयातील एक तज्ञ शिक्षक, विद्यार्थ्यांचे आवडते शिक्षक म्हणून त्यांनी बघता--बघता महाविद्यालयात जम बसविला. आपल्या शिस्तप्रिय वर्तनाने, अभ्यासूवृत्तीने त्याच महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी विराजमान झाले. आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या अनेक मान्यवरांनी सांभाळलेले हे पद डॉ. आप्पासाहेब पवार यांनी तितक्याच तोलामोलाने सांभाळले. पुढे ते गुजरातमधील विसनगरच्या एम्.एन्.कॉलेजचे प्राचार्य झाले. हे प्राचार्यपद म्हणजे त्यांची सत्वपरीक्षाच होती. या सत्वपरीक्षेत ही ते यशस्वी झाले. विसनगरवासीयांच्या सदैव स्मृतीत राहिल असेल त्यांचे कार्य झाले.

त्यांच्या कर्तव्यनिष्ठेची, सत्यप्रियतेची नोंद घेऊन, त्यांची सरकारने जुन्या मुंबई राज्याच्या शिक्षण उपसंचालकपदी नेमणुक केली. एक उत्तम आणि कुशल प्रशासक म्हणून त्यांची कारकीर्द नेत्रदीपक झाली. शालांत परीक्षा मंडळाच्या कारभारात आमूलाग्र बदल करुन, त्या कारभाराला पध्दतशीर व कार्यक्षम रुप देण्याचे महत्वपूर्ण कार्य अध्यक्ष या नात्याने त्यांनी केले. सुरुवातीला जुन्या मुंबई राज्याचे शिक्षण सहसंचालक व शिक्षण संचालक आणि नंतर महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक म्हणून त्यांनी झोपडया--झोपडयांतून ज्ञानदीप लावला. संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार प्रभावीरित्या करण्यात ते यशस्वी झाले.

जेव्हा ते शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरु झाले, तेव्हा त्यांच्या कारकीर्दीच्या यशस्वीतेचा उच्चांक गाठला गेला. जेव्हा नोव्हेंबर 1962 ला शिवाजी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली, तेव्हा 'शिवाजी विद्यापीठ" या एका नावाशिवाय विद्यापीठाचे स्वतःचे असे अस्तित्व नव्हते. डॉ. आप्पासाहेब पवार यांनी अक्षरशः शून्यापासून सुरुवात केली आणि अल्पावधीत सागरमाळाचे एक सुंदर नंदनवनात रुपांतर करुन दाखविले. त्यांची दूरदृष्टी, सूक्ष्म अवलोकन क्षमता आणि कठोर परिश्रम यांच्या अविरत सिंचनातून हे भव्य-दिव्य शिल्प उभे राहिले आहे. अत्यंत निष्ठेने, चिकाटीने आणि धैर्याने त्यांनी विद्यापीठाचा परिसर साकार केला आहे.

डॉ. आप्पासाहेब पवार यांनी विद्यापीठाचे बाहयांग मनमोहक बनविण्यात कोणतीच कसर ठेवली नाही. विद्यापीठाचे अंतरंग ही कष्टपूर्वक घडवून विशिष्ठ प्रथा व परंपरा निर्माण करण्यातही ते अग्रभागी राहिले. कै. ना. यशवंतराव चव्हाण यांनी म्हटल्याप्रमाणे अभिमान वाटावा अशा नव्या परंपरा या नव्या विद्यापीठात त्यांनी निर्माण केल्या.

विद्यार्थी जर शाळेपर्यंत पोहोचण्यास अडचणी येत असतील तर, शिक्षणाने त्यांच्याकडे गेले पाहिजे, हा विचार पक्का करुन त्यांनी आपल्या कारकीर्दीत ग्रामीण भागाशी संपर्क ठेवला. ग्रामीण जनतेशी जिल्हाळयाचे नाते जोडण्याचे त्यांचे कार्य विद्यापीठाच्या रुपाने साकार झाले. त्यांनी खऱ्या अर्थाने विद्यापीठ लोकांपर्यंत नेले. बहि:शाल शिक्षण मंडळामार्फत खेडयांपाडयांतून शिबिरे भरविली, खेडे दत्तक योजना सुरु केली आणि ग्रामीण जनता व विद्यार्थी, शहरी विद्यार्थी, खेडयातील व शहरातील शिक्षक, कुलगुरु आणि विद्यापीठ यांच्यात असा काही मेळ घातला की, जिथे शाळा पोहोचली नव्हती, तेथील लोकांना त्यांनी विद्यापीठाची ओळख करुन दिली. महाराष्ट्र विधानसभेत "लोकाभिमुख विद्यापीठाचा आदर्श" असा शिवाजी विद्यापीठाचा गौरव झाला तो त्यामुळेच ।

ग्रामीण भागातील मुलांना उच्च शिक्षण घेता यावे म्हणून त्यांनी "कमवा आणि शिका" योजना सुरु केली. या योजनेचा लाभ घेतलेले अनेक विद्यार्थी आज अनेक ठिकाणी उच्चपदावर आहेत. विद्यार्थ्यांच्या हितरक्षणासाठी 'विद्यार्थी कल्याण मंडळ' स्थापन करुन, विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या कारभारात सहभागी करुन घेतले. विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून उभी राहिलेली "डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन" ही वास्तू म्हणजे विद्यार्थ्यांच्या विधायक कार्याची साक्ष आहे.

"विद्यार्थी" हाच केंद्रबिंदू मानून त्यांनी विद्यार्थ्यांची मने जशी विद्यापीठ कार्याशी गुंतवून घेतली, तशीच प्राध्यापकांना अध्यापनाची गोडी लागावी, त्यांना नव्या ज्ञानाचा व तंत्राचा परिचय व्हावा म्हणून त्यांनी स्वत: प्राध्यापकांसाठी उद्‌बोधन वर्ग चालविले. विद्यापीठाचा संबंध थेट माध्यमिक व प्राथमिक शाळेपर्यंत पोहोचावा म्हणून इंग्रजी, गणित व विज्ञान विषयांचे प्रशिक्षण वर्ग सुरु केले. मुख्याध्यापक संघाच्या मदतीने शिबीरे घेतली. प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी प्रतिनिधींचा मेळावा भरविला. स्वावलंबन व स्वयंसेवेचे महत्व विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविले आणि नो रेक्टर नो कॉंट्रॅक्टर पध्दतीने वसतिगृहांचे व्यवस्थापन चालू केले. वाङ.मय केंद्रित अभ्यासक्रम बदलून भाषाकेंद्रित अभ्यासक्रम सुरु केला. त्यासाठी विद्यापीठाची स्वत:ची पाठयपुस्तके तयार करुन घेतली. सेमिस्टर पध्दत सुरु केली. पदवीधरांचे इंग्रजीचे ज्ञान वाढावे म्हणून "प्रोफियन्सी क्लास" सुरु केले. राज्य व राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षांची तयारी करुन घेण्यासाठी प्रशिक्षण वर्ग सुरु केले. "व्यवसायाभिमुख आणि जीवनभिमुख शिक्षण" ही दृष्टी ठेवून त्यांनी अनेक नवे शैक्षणिक उपक्रम राबविले. त्यांच्या अनेक योजना विद्यापीठ अनुदान मंडळानेसुध्दा उचलून धरुन देशभर राबविण्यास सुरुवात केली आहे. यावरुन त्यांचा शैक्षणिक दूरदर्शीपणा दिसून येतो.

बौध्दीक क्षेत्राप्रमाणेच त्यांचे क्रीडाक्षेत्राकडेही लक्ष होते. क्रिकेट, कुस्ती व ॲथलेटिक्स मध्ये शिवाजी विद्यापीठाचे नांव जागतिक क्रीडाक्षेत्रात गाजले. त्यामागे डॉ. आप्पासाहेब पवार यांनी सुरु केलेली कोचिंग योजना होती.

भारत-लंका आंतरविद्यापीठ महामंडळाच्या अध्यक्षपदी त्यांची झालेली निवड म्हणजे त्यांच्या कर्तबगारीला आणि शिवाजी विद्यापीठाला मिळालेली जागतिक मान्यताच होय.

ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे वेळच्यावेळी परीक्षा घेणारे व निकाल जाहिर करणारे विद्यापीठ म्हणून शिवाजी विद्यापीठाकडे बोट दाखविले जाते. या शिस्तीचे सर्व श्रेय डॉ. आप्पासाहेब पवार यांनाच आहे. डॉ. आप्पासाहेब पवार जसे कणवाळू होते तसेच ते प्रसंगी निष्ठूर ही बनत. त्यांचा विद्यापीठाच्या संपूर्ण कारभारावर दरारा होता. त्या आधाराने त्यांनी विद्यापीठातील कर्मचा-यांत, प्राध्यापकांत व विद्यार्थ्यांत जी शिस्त निर्माण केली, ती निश्चितच कौतुकास्पद आहे. त्यांनी विद्यापीठाच्या प्रत्येक क्षेत्रात एक भक्कम पायंडा घालून दिला. त्यामुळे विद्यापीठाचे कामकाज आजही विनातक्रार चालू आहे.

डॉ. आप्पासाहेब पवार हे एका बाजूला जसे समर्थ प्रशासक होते, तसेच दुस-या बाजूला मराठा इतिहासाचे व्यासंगी संशोधक व अभ्यासकही होते. मराठा इतिहासाचे मूलगामी संशोधन व्हावे म्हणून त्यांनी अतिशय परिश्रमपूर्वक दुर्मिळ कागदपत्रे संपादित केली आणि ती ग्रंथरुपाने प्रकाशित केली. त्यामुळे इतिहास संशोधकांना संशोधनाचे एक व्यापक दालन मिळाले. राजर्षि छत्रपति शाहू महाराजांच्या जीवन--कार्याविषयी सखोल संशोधन करता यावे म्हणून त्यांनी पुढाकार घेऊन शाहू संशोधन केंद्र सुरु केले. स्वतःची तब्बेत बरी नसतानाही जागरण करुन त्यांनी महाराणी ताराबाईंच्यावर घेण्यात आलेल्या आक्षेपांना साधार सणसणीत प्रत्युत्तर देणारा लेख तयार केला. एवढेच नव्हे तर, पुण्यात दवाखान्यात असताना त्यांनी महाराणी ताराबाईसंबंधी वाचनात आलेल्या मजकूराचे खंडन करणारा लेख तात्काळ लिहून पाठवून दिला. यावरुन इतिहास संशोधनाविषयीची त्यांची आस्था दिसून येते.

प्रशासन आणि संशोधन या दोन्ही आघाडया समर्थपणे सांभाळत असतानाच, राज्य व केंद्र शासनाच्या विविध समित्यावर सदस्यापासून ते अध्यक्षापर्यंतच्या अनेक पदावरुन त्यांनी केलेले कार्य ही त्यांच्या अष्टपैलु व्यक्तिमत्वाची साक्ष देणारे आहे. त्यांनी विविध समित्यांचे अहवाल जसे तातडीने

पूर्ण करुन दिले, तशाच महत्वपूर्ण शिफारशी करुन शास्नाच्या कार्याला नवी दिशा दिली. इतिहास विषयीशी संबंधित समित्यांवर काम करताना त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला.

शाहू व्याख्यानमाला, मराठा--इतिहास व्याख्यानमाला, अशा बौध्दिकांची पाणपोई विद्यापीठात खुली करुन समाजाच्या ज्ञानसाधनेची तहान भागविली. संस्कृत–प्राकृत प्रकाशनमाला, कवी कुंजविहारींच्या स्वातंत्र्यप्रिय कविता संग्रहाचे प्रकाशन, इतिहास ग्रंथ प्रकाशनमाला याव्दारे सामाजिक प्रबोधनाचे कार्य अखंडपणे केले.

डॉ. आप्पासाहेब पवार यांची काम करण्याची हातोटी अगदी स्पष्ट आणि ठाशिव होती. एकदा त्यांना एखादी गोष्ट पटली की, ती पूर्ण केल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे. या त्यांच्या स्वभाव विशेषामुळे विद्यापीठ उभारणीचे काम हेच त्यांना "टॉनिक" ठरले ! त्यामुळे दुर्धर आजारात अक्षरशः मृत्यूशी सामना करुन ते परत आले आणि दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर पुन्हा कामाला लागले. आपल्या कर्तव्याला – कर्माला परमेश्वर मानून त्यांनी केलेली शिवाजी विद्यापीठाची उभारणी ही आधुनिक काळात एक नवा आदर्श निर्माण करणारी आहे.

डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या मार्गात अनेक अडथळे आले. त्यांना जसा त्यांच्याच लोकांचा त्रास झाला, तसाच किंबहुन त्यापेक्षा जास्त त्रास पुणे–मुंबईकरांच्यासारख्या तथाकथित बुध्दीवाद्यांचा झाला. एका ठिकाणी पुणेकर असे म्हणाले की, " कोल्हापूरात विद्यापीठाच्या नावाखाली महाराष्ट्रातील सहावी खानावळ निघाली." कांहीचे म्हणणे तर असे होते की, "विद्यापीठ चालविणे म्हणजे तालमीच्या कट्ट्यावर बसून दुस--याचे राजकारण खोळण्याइतपत सोपे काम नाही." परंतु अशी खालच्या पातळीवरची कितीही टीका झाली तरी, डॉ. आप्पासाहेब पवार यांनी जवळ जवळ तेरा वर्षे त्यांच्या कुलगुरुपदाची धुरा इतक्या समर्थपणे सांभाळली की, शिवाजी विद्यापीठ आज महाराष्ट्रातीलच नव्हे तर, भारतातील एक मातब्बर विद्यापीठ होऊ पहात आहे. खाणावळ – तालमीच्या भाषा करणा--या या बुध्दीवाद्यांना आज तोंड उघडायला जशी संधी नाही, तशीच तोंड लपवायलाही जागा नाही. पण यासाठी सर्वात जास्त कष्ट डॉ. आप्पासाहेब पवार यांचे खर्ची पडले आहेत. डॉ.आप्पासाहेब पवार यांना सलग चारवेळा कुलगुरुपदी मुदतवाढ मिळते यातच त्यांच्या कर्तबगारीचे यश सामावलेले आहे.

महागांवकर बंगल्यात लावलेल्या विद्यापीठाच्या छोटया रोपाचे सागरमाळावर विराटवृक्षात रुपांतर करण्याचे असामान्य कार्य डॉ. आप्पासाहेब पवार यांनी करुन दाखविले. या वृक्षाच्या फांद्या जसजशा वाढतील तसतशी जबाबदारी वाढत होती. या फांद्या पाच जिल्ह्यात पसरल्या होत्या. पण डॉ. आप्पासाहेब पवार या ओझ्याने खचले नाहीत, की झुकले नाही. दिवसातून ते किती तास काम करीत होते म्हणण्यापेक्षा ते विश्रांती घेत होते की नाही असा संभ्रम पडण्याइतपत त्यांची सर्व ठिकाणी उपस्थिती असे. या कष्टाचे चीज झाले. एक आदर्श विद्यापीठ म्हणून शिवाजी विद्यापीठाचा लौकिक वाढला. शिवाजी विद्यापीठाला "लोकपीठ" बनविण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांच्याहातून घडले. ते खऱ्या अर्थाने शिवाजी विद्यापीठाचे शिल्पकार ठरले. शिवाजी विद्यापीठाच्या रुपाने ते अजरामर झाले.

डॉ. आप्पासाहेब पवार यांनी अनेक शैक्षणिक पदावर महत्वपूर्ण कार्य केले असले तरी, त्यांचे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरुपद या सर्वात उठून दिसते. शिवाजी विद्यापीठाचे शिल्पकार म्हणूनच ते शैक्षणिक क्षेत्रात मान्यता पावले आहेत.

शिवाजी विद्यापीठाला भेट दिल्यानंतर, डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या एकसष्ठी समारंभानिमित्त आणि डॉ. आप्पासाहेब पवार सात–आठ महिन्याच्या आजारपणाच्या रजेनंतर पुन्हा कुलगुरुपदी रुजू झाल्यानंतर महाराष्ट्राच्या या थोर सुपुत्राबद्दल नामवंतांनी व्यक्त केलेले काही अभिप्राय असे –

डॉ. हेमंत वि. इनामदार शिवाजी विद्यापीठात संत नामदेव व्याख्यानमालेत बोलताना म्हणाले, "'माळाचे मनोगत' ही कविता लिहिणाऱ्या कवीला या परिसरामुळे 'सागरमाळाचे मनोगत' अशी कविता लिहिण्याची स्फूर्ती होईल असा हा परिसर कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार यांनी निर्माण केला आहे. दक्षिण महाराष्ट्राचे सुंदर संगमरवरी स्वप्न त्यांनी साकार केले आहे."[1]

"अल्पशा काळात शिवाजी विद्यापीठाचा परिसर इतका प्रेक्षणीय झाला आहे हे पाहून आनंद वाटतो. कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार यांचा पुढाकार आणि मिशनरी वृत्तीने, समर्पणाच्या भावनेने कार्य करण्याची त्यांची जिद्द यामुळे ही वैशिष्ठयपूर्ण प्रगती होऊ शकली. त्यांनी विद्यार्थी वर्गात निःस्वार्थी सेवेची भावना निर्माण करुन नव महाराष्ट्र उभारणीचे इतरांना उदाहरण घालून दिले

आहे."[2] असा अभिप्राय महाराष्ट्राचे माजी आरोग्यमंत्री ना. रफिक झकेरिया यांनी शिवाजी विद्यापीठाला भेट दिल्यानंतर व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाच्या सहाव्या पदवीदान समारंभाचे प्रमुख पाहुणे केंद्रिय शिक्षण व युवक कल्याण मंत्री ना.डॉ.व्ही.के.आर्.व्ही.राव यांनी शिवाजी विद्यापीठाच्या कार्याचा गौरव करताना म्हटले की, "कोल्हापूर महाराष्ट्राची राजधानी नाही की भारताची राजधानी नाही, महाराष्ट्रातील ते एक शहर आहे. म्हणूनच हे ग्रामीण विद्यापीठ म्हणायचे. अन्यथा या विद्यापीठाने इतके चांगले कार्य केले आहे की, त्याचा धडा मुंबई, कलकत्ता, दिल्ली अथवा मद्रास अशासारख्या ठिकाणी असणाऱ्या अनुभवी सहकाऱ्यांना उचलता येईल ।"[3]

डॉ. आप्पासाहेब पवार यांचा एकसष्ठीपूर्तीनिमित्त 5 मे 1968 रोजी भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या समारंभानिमित्य पाठविलेल्या शुभसंदेशात भारताचे माजी गृहमंत्री कै. यशवंतराव चव्हाण म्हणतात, "कोल्हापूरात डॉ. आप्पासाहेब पवार यांनी शिक्षणक्षेत्रात केलेले कार्य प्रशंसनीय आहे. एवढेच नव्हे तर, शाहूमहाराजांनी घातलेल्या पायावर आप्पासाहेबांच्या नेतृत्वाखाली शिवाजी विद्यापीठाने भरीव कामगिरी करुन कळसच चढविला आहे. दक्षिण महाराष्ट्रातील भागात ज्ञानगंगा पोहोचविण्याच्या शिवाजी विद्यापीठ करीत असलेल्या कार्यात डॉ.आप्पासाहेब पवार यांचा मोठा वाटा आहे. डॉ. आप्पासाहेब पवार यांनी शिवाजी विद्यापीठ खऱ्या अर्थाने लोकाभिमुख केले आहे."[4]

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै.ना.वसंतराव नाईक आपल्या शुभसंदेशात म्हणतात, "शिक्षणाचा दर्जा घसरणार नाही याकडे लक्ष देणे व महाराष्ट्रातील शिक्षणाचा कस कायम राखण्यासाठी व्यापक प्रयत्न करणे याकामी डॉ. आप्पासाहेब पवार यांच्यासारख्या अनुभवी व शिक्षणक्षेत्रात वाकबगार ठरलेल्या व्यक्तीचे आपणास बहुमोल सहाय्य लाभले."[5]

महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षण व वनमंत्री ना.म.घ. चौधरी आपल्या शुभसंदेशात म्हणतात, "डॉ.आप्पासाहेब पवार यांचा पुरोगामी दृष्टीकोन व सामान्य माणसाविषयीची कळकळ यामुळे त्यांच्याकडे सोपविण्यात आलेली सर्व कार्ये त्यांनी मोठया कार्यक्षमतेने व यशस्वीपणे हाताळली आहेत. परंतु त्यांच्या या सर्व कार्याचा कळस म्हणजे शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरु म्हणून त्यांनी केलेले कार्य होय."[6]

महाराष्ट्र राज्याचे माजी गृहनिर्माण व राज्यमार्ग परिवहन महामंडळ मंत्री ना. यशवंतराव मोहिते आपल्या शुभसंदेशात म्हणतात, "विशिष्ठ ध्येयप्रणाली, कुशाग्रबुध्दीमत्ता, संघटना चातुर्य व चिकाटी या सद्‌गुणांच्या सहाय्याने डॉ. आप्पासाहेब पवार यांनी महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात अमोल असे कार्य केले असून एक ख्यातनाम शिक्षणतज्ञ म्हणून अनेक जबाबदारीची स्थाने आपल्या कर्तृत्वाने विभूषित केली आहेत. अगदी अल्पकाळात शिवाजी विद्यापीठाची झालेली प्रस्थापना व शीघ्रगतीने होत असलेला उत्कर्ष हे त्यांच्याच अविश्रांत परिश्रमांचे व कार्यकुशलतेचे प्रतिक आहे."[7]

भारत-लंका आंतरविद्यापीठ महामंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ. आप्पासाहेब पवार यांचा इचलकरंजी (जि. कोल्हापूर) येथील आर्टस्, सायन्स व कॉमर्स कॉलेजच्यावतीने सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या समारंभात स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संचालक, संस्थापक कै.बापूजी साळुंखे म्हणाले की, "आजच्या तरुण पिढीपुढे प्रेरणास्थाने नाहीत, जी आहेत ती पुढे आणली जात नाहीत. पण डॉ. आप्पासाहेब पवार हे विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या स्वतःच्या आचरणात कृत्रिमता नाही. त्यांची तत्वे प्रत्यक्ष कृतीतून निर्माण झाली आहेत. परिश्रम, व्यासंग, सदाचार, तपश्चर्या यामुळे त्यांचा आदर्श भावी पिढीस फलदायी ठरणार आहे."[8]

2 ऑक्टोबर 1971 च्या एका समारंभात बोलताना माजी इतिहास विभाग प्रमुख प्रा.कापसे कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार यांच्याविषयी म्हणाले, "डॉ. आप्पासाहेब पवार यांनी मातापित्यांचे अंतःकरण ठेवून शिवाजी विद्यापीठाची उभारणी केली आहे. असा कर्तृत्ववान कुलगुरु भारतातील पहिलाच कुलगुरु होय."[9]

खटाव तालुका विद्यार्थी संघटनेच्या वतीने शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार यांची चौथ्यावेळी कुलगुरु पदावर निवड झाल्याबद्दल वडूज येथे 5 डिसेंबर 1971 रोजी खासदार किसन वीर यांच्या अध्यक्षतेखाली भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. अध्यक्ष पदावरुन बोलताना खासदार किसन वीर म्हणाले, "डॉ. आप्पासाहेब पवार हे एक महाराष्ट्रातील थोर शिक्षणतज्ञ, शिक्षणशार्दुल होत. तसेच ते इतिहास संशोधक आहेत. त्यांनी शिवाजी विद्यापीठाची अल्पकाळात नेत्रदीपक प्रगति केली आहे. . . . . . त्यांनी खऱ्या अर्थाने विद्यापीठाची शान वाढविण्याचा फार मोठा प्रयत्न केला आहे."[10]

डॉ. आप्पासाहेब पवार सात--आठ महिन्याच्या आजारपणाच्या रजेनंतर दि. 17 डिसेंबर 1973 रोजी पुन्हा कुलगुरुपदी रुजू झाले. तेव्हा विद्यापीठाचे विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यांच्या-प्रमाणेच अनेक व्यक्तीं, संस्था, वृत्तपत्रें यांनी त्यांच्यावर स्वागत--अभिनंदनाचा वर्षाव केला. अनेक व्यक्तींनी पत्रे पाठवून, तर स्थानिक वृत्तपत्रांनी अग्रलेख लिहून आपल्या शुभेच्छा व्यक्त केल्या.

कोल्हापूरच्या "दै. समाज" ने आपल्या दि. 17 डिसेंबर 1973 च्या अग्रलेखात म्हटले की, " आजच्या विद्यापीठाचे स्वरुप हे डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या श्रमाचे व बुध्दीमत्तेचे फलित आहे."[11].

"दै. इंद्रधनुष्य" ने आपल्या अग्रलेखात (दि. 18--12--1973) म्हटले की, "डॉ.आप्पासाहेब पवार यांच्यासारखा कुशल प्रशासक, सर्वसमावेशक शिक्षणतज्ञ आणि पुरोगामी विचारांचा वारसा असणारा विचारवंत लाभला म्हणूनच शिवाजी विद्यापीठाची वाटचाल यशोमंदिराकडे जाऊ लागली आहे. डॉ. आप्पासाहेब पवार यांनी अहोरात्र झटून विद्यापीठाची उभारणी केली आणि अनेक थोर व्यक्तींनी कित्येक वर्षे उराशी बाळगलेले स्वप्न साकार केले."[12]

पंचगंगा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन व देशभक्त आ. रत्नाप्पा कुंभार यांचे पत्र अतिशय बोलके आहे. दि. 9--12--1973 च्या आपल्या पत्रात कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार पुन्हा कामावर रुजू होत असल्याबद्दल होणारा आनंद "शब्दात व्यक्त करता येत नाही" असे म्हणून आ. रत्नाप्पा कुंभार पुढे म्हणतात की, "आजपर्यंतचे आपले शिक्षणकार्य हे आपल्या जीवनाचे स्मारकच बनून राहिले आहे. आपल्या या महत्वपूर्ण शिक्षण कार्यातील स्मारकावरील उज्वल शिखर म्हणून शिवाजी विद्यापीठ वैभवाने डोलत आहे. निष्ठेने, प्रमाणिकपणे आणि कळकळीने काम केले तर एक मनुष्य काय करु शकतो याची प्रचिती आपल्या कार्यावरुन येते."[13]

शिवाजी विद्यापीठाच्या कक्षेतील अनेक प्राचार्य व प्राध्यापकांनी कुलगुरु डॉ.आप्पासाहेब पवार यांच्या पुनरागमनाचा आनंद पत्ररुपाने प्रकट केला. प्रा. माधव माळी आपल्या पत्रात म्हणतात, "आपण शिवाजी विद्यापीठाचे शिल्पकार आहातच. पण दक्षिण महाराष्ट्राचेही शिल्पकार आहात. आपली जिद्द आणि महत्वकांक्षा मोठी -- फारमोठी आहे."[14]

पुणे विभाग मुख्याध्यापक मंडळातर्फे डॉ. आप्पासाहेब पवार यांचा सत्कार समारंभ घेण्यात आला. यावेळी पुणे विभाग मुख्याध्यापक मंडळाचे अध्यक्ष श्री.दि.रा.घोरपडे म्हणाले की, "शिवाजी

विद्यापीठाने सर्वात प्रथम प्राथमिक व माध्यमिक शाळांशी दुवा जोडून नवी दृष्टी दिली. त्याचे श्रेय कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार यांना आहे. चालू पिढीत शैक्षणिक कार्य करणारा एवढा मोठा माणूस कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार यांच्याखेरीज दुसरा कोणी नाही."[15]

या सत्कार समारंभात कोल्हापूरचे श्री. रामभाऊ सप्रे म्हणाले की, "राजर्षि शाहू महाराजांचे खरेखुरे एकमेव शिष्य म्हणून डॉ. आप्पासाहेब पवार यांचाच उल्लेख करावा लागेल. शाहू तत्वज्ञान पुढे नेण्याच्या दृष्टीने त्यांनी फार महत्वाची कामगिरी केली आहे. अशा कर्तृत्वान व्यक्तीबद्दल आपण कृतज्ञता व्यक्त केली नाही तर, आपण माणूस म्हणून जगण्यास लायक नाही असेच म्हणावे लागेल."[16]

प्रायव्हेट हायस्कूलचे श्री. पळसुले म्हणाले की, 'शिवाजी विद्यापीठ हेच एक विद्यापीठ असे आहे की, कुलगुरुपर्यंत विद्यार्थी सहज संपर्क साधू शकतात. कुलगुरु व विद्यार्थी यांच्यातील सौहार्दाचे असे चित्र अन्यत्र दिसत नाही."[17]

महाराष्ट्राच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेताना डॉ. आप्पासाहेब पवार यांचे कार्य ठळकपणे नजरेत भरते. उच्च शिक्षणाची गंगोत्री खेडयापाडयांतील गोरगरीब मुलांना दान करणारा व त्यांची अस्मिता जागृत करणारा हा एक दूरदृष्टीचा शिक्षण महर्षि होता. बहुजन समाजाच्या उत्थानाचे कार्य हेच आपले जीवन मानणारा हा कर्मवीर होता. अनेकांचे संसार उभे करणारा हा कल्याणकारी कुलगुरु होता. जेथे जाईल तेथे नवनिर्मिती साधणारा हा शिल्पकार होता. मराठयांच्या इतिहास नव्याने संशोधन करुन चुकीचा इतिहास भुईसपाट करणारा हा खरा "इतिहासनिष्ठ" संशोधक होता. शासकीय कामाला आकार देऊन मानवी जीवन साकार करणारा हा कर्तव्यकठोर पण प्रेमळ प्रशासक होता. या सर्वांपेक्षाही महत्वाचे म्हणजे तरुणांच्या भाव-भावना जाणून त्यांच्याशी समरस होणारा हा मानवी मनाचा डॉक्टर होता.

खरोखरच, डॉ. आप्पासाहेब पवार हे बहुजनसमाजाचे स्फूर्तिस्थान आहेत. संपूर्ण देशभर शैक्षणिक क्षेत्रात एक नवी दृष्टी देऊन सृष्टी निर्माण करण्याचे, अनेक थोर व्यक्तींचे शैक्षणिक स्वप्न साकार करण्याचे ध्येय पत्करुन त्यांनी स्वतःला व इतरांना अक्षरशः भारुन टाकले. एक ध्येयधुंद कर्मयोग्याचा, ज्ञानतपस्वीचा आदर्श स्वतःच्या जीवनाच्या रुपाने समाजासमोर उभा केला. ते ख-या अर्थाने महाराष्ट्राच्या शैक्षणिक पर्वाचे शिल्पकार ठरले. अशा या ज्ञानसूर्यास महाराष्ट्र कधीही विसरणार नाही.

।।।

# – संदर्भ – साधने –

1. शिवसंदेश त्रैमासिक, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन,कोल्हापूर, ऑक्टोबर–डिसेंबर 1970,पृ.26.

2. कित्ता, पृ.19.

3. शिवसंदेश त्रैमासिक, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन,कोल्हापूर, ऑक्टोबर–डिसेंबर 1969,पृ.48.

4. डॉ. आप्पासाहेब पवार जीवन–दर्शन गौरव अंक, 1968, पृ.1.

5. कित्ता, पृ.5.

6. कित्ता, पृ.24.

7. कित्ता, पृ.25.

8. दै. पुढारी, कोल्हापूर, 15 मार्च 1971.

9. दै. पुढारी, कोल्हापूर, 3 ऑक्टोबर 1971.

10. दै. पुढारी, कोल्हापूर, 6 डिसेंबर 1971.

11. शिवसंदेश त्रैमासिक,शिवाजी विद्यापीठ प्रकाशन,कोल्हापूर, ऑक्टोबर–डिसेंबर 1973,पृ.6.

12. कित्ता, पृ.7.

13. कित्ता, पृ.8.

14. कित्ता, पृ.17

15. शिवसंदेश त्रैमासिक,शिवाजी विद्यापीठ प्रकाशन,कोल्हापूर, जानेवारी–मार्च 1974, पृ.14.

16. कित्ता.

17. कित्ता.

=/=/=/=/=